
शैक्षणिक उपक्रम संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी

# ई-प्रशिक्षक

प्रयोगशील प्रतिभासंपन्न शिक्षकांसाठीचे ई-मासिक

राष्ट्रीय सौर माघ-फाल्गुन शके १९४३
फेब्रुवारी २०२२
वर्ष : ९  अंक : ४



# संपादकीय



सस्नेह नमस्कार,

ऑनलाईन का ऑफलाईन ?

परीक्षा ऑनलाईन का ऑफलाईन या चर्चेचे झुंडीत रुपांतर होण्याच्या पार्श्वभूमीवर हे संपादकीय लिहित आहे.

करोनाच्या जानेवारी महिन्यात वाढलेल्या रुग्ण संख्येने डिसेंबर महिन्यात थोडे मार्गी लागलेले शिक्षण जगत परत अडखळते आहे. खरंतर परीक्षा प्रत्यक्ष होणे याला पर्याय असू शकत नाही. पण शासकीय निर्णयांनी अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. ज्यांचे लसीकरण झाले आहे, जे स्वत:च्या मर्जीने बाहेर हिंडत आहेत असे महाविद्यालयीन युवक अजून महाविद्यालयात जात नाहीत, त्यांच्या परीक्षा ऑनलाईन. मग शाळेच्याच का प्रत्यक्ष अशा निर्णयातील तफावतीमुळे खरंतर अशा चर्चांना हवा मिळते आहे.

सहजसाध्य करण्याच्या प्रवृत्तीने खरंतर अशा मागण्या पुढे येतात, त्यांना सामूहिक मागणीचे रूप आल्यासारखे दिसते आणि काहीवेळा उथळ प्रसिद्धीसाठी अशा मागण्या मान्यदेखील केल्या जातात.

परीक्षा ऑनलाईन का ऑफलाईन या चर्चेच्या निमित्ताने खरंतर शिक्षणजगताने नापास करायचे का नाही का प्रगतीशिवाय पुढे नाही अशा गेल्या दहा वर्षातील अनेक महत्त्वाच्या शिक्षण जगतातील तरतुदींचा आढावा घेण्याची संधी म्हणून या कालखंडाकडे पाहिले तर संचलन करताना मध्येच एकदा 'चेक' म्हणून पावले जुळवून घ्यावी लागतात, तसे या शैक्षणिक आपत्तीच्या काळाकडे वळून बघण्याची संधी म्हणून पाहूया आणि आपली शैक्षणिक उद्दिष्टे आणि शैक्षणिक प्रक्रिया यांचा आढावा घेऊया.

**सस्नेह,**

**प्रशांत दिवेकर**

***


**संस्थापक संपादक**
**कै. विवेक पोंक्षे**

**संपादक**
**प्रशांत दिवेकर**

**अक्षरजुळणी व मांडणी**
**सोहम क्रिएशन**
**८६०५५६७६५७**

# बहुविध कौशल्य विकसनासाठी कार्यक्रम : अर्थात पुस्तकाबाहेरील शिक्षण

खरं तर शीर्षक पाहून प्रत्येकाला वाटेल की मग पुस्तकातील शिक्षणाचं काय? पण पुस्तकातील सर्व अध्ययन निष्पत्ती पूर्ण करूनच हे पुस्तकाबाहेरील शिक्षण माझ्या विद्यार्थ्यांना द्यावे अशी मला कल्पना सुचली. ही कल्पना सुचण्याचे अनेक कारणे आहेत त्यामधील सर्वात प्रमुख कारण म्हणजे माझ्या आंतरराष्ट्रीय पुरस्काराच्या मुलाखतीत मला विचारला गेलेला प्रश्न होता. तुम्ही शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना पुस्तकाबाहेरचं म्हणजे जे असं की विद्यार्थ्यांना त्यांच्या आयुष्यात त्याचा फायदा होईल असं काही शिकवता का? आणि मग माझ्याकडे याचं उत्तर अगदी अल्पसं आलं म्हणजे खरंतर वेळ मारून नेण्यासाठी मी मूल्यशिक्षण असे उत्तर दिलं होतं व काही प्रमाणत ते खरेही होतं. मात्र त्या दिवशीपासून मी विचार करायचो की असं आपण खरचं काही शिकवतो का की ज्याचा उपयोग माझ्या विद्यार्थ्यांना भविष्यात त्यांचं आयुष्य सुलभ करण्यास व राष्ट्र उन्नत्तीच्या कामात उपयोगी पडेल?

मग मी विचार केला की आपण असं काही का शिकवत नाही? त्याचं उत्तर मला खूप विचार केल्यानंतर असं भेटलं की काहीतरी असं नाविन्यपूर्ण शिकवायचं असल्यास ते अगोदर आपल्याला आलं पाहिजे. मग मला असं काय येतं? किंवा मी असं काही माझ्या शालेय जीवनात शिकलो की जे पुस्तकाबाहेरचं आहे व ते सध्या माझ्या आयुष्यात मला लाभदायक ठरून त्याचा राष्ट्र उन्नती किंवा इतरांना फायदा होतोय? आणि चटकन माझे श्री. गाडेसर मला आठवले की जे गणित तर सर्वोत्तम शिकवायचे मला पण मला त्यांना वक्तृत्व व वादविवाद कौशल्ये सातत्याने शिकवून विविध स्पर्धामध्ये मला सहभागी करून यशाचा एक नवा मार्ग दाखवला व आज त्या एकमेव कौशल्यामुळे मी देशभरातील शिक्षकांसाठी २०० कार्यशाळा घेऊन शिक्षणातील विविध प्रयोग जगासमोर सहजपणे मांडतोय व इतरांनाही त्याचा खूप फायदा होतोय.

मग एक शिक्षक म्हणून मी माझ्या विद्यार्थ्यांना मला असं काही शिकवायचं असल्यास मी काय करू शकतो? हा विचार सर्वप्रथम माझ्या डोक्यात आला आणि मग त्याचं उत्तर भेटलं की जे शिकवायचं ते अगोदर तुम्हाला आलं पाहिजे. हे सर्व जून २०२० मध्ये विचार सुरू होते, कोविडमुळे शाळाच काय पूर्ण जग बंद होतं आणि मग ठरवलं की आपणही असं काहीतरी शिकायचं की आपल्याला ते आपल्या विद्यार्थ्यासाठी उपयोगी ठरेल आणि मग त्याची यादी करणे सुरू झाले व ऑनलाईन ते कसे व कोठून शिकता येईल याबद्दल माहिती घेऊ लागलो आणि शिकायला सुरुवात पण केली. आणि जवळपास ३ ते ४ महिन्यात मी माझ्या मुलीबरोबर भक्तीबरोबर घरी बसून काही कोर्सेस पूर्ण केले व अशा काही बाबी किंवा कौशल्ये शिकलो की जे मी माझ्या शालेय अथवा डी.एड. मध्येही मला शिकायला भेटले नाहीत, जे खरं तर एक शिक्षक म्हणून अशा बाबी शिकणं आवश्यक असतं.

आता या बाबी मी शिकलो मात्र शिकलेली प्रत्येक गोष्ट आपल्याला विद्यार्थ्यांना सहजपणे शिकवता येतेच असे नाही कारण एक तर ती नवीन असते, त्यासाठीचे आवश्यक साहित्य उपलब्ध असावे लागते, त्यासाठी वेगळा वेळ द्यावा लागतो, प्रत्येक विद्यार्थ्यांना वेगळ्या गोष्टीत रस असतो, पुरेसं मनुष्यबळ, आर्थिक पाठबळ, मग मी तर १ ते ४ च्या शाळेत एकटाच शिक्षक, कोविडमुळे सी.एस.आर. आरोग्याकडे वळला होता, अशा एक ना अनेक

अडचणी माझ्यासमोर उभ्या राहिल्या, मात्र मी ठरवले की यावर्षी काही झाले तरी कमीतकमी ५ अशी कौशल्य मुलांना शिकवायची जे त्यांना आयुष्यभर उपयोगी पडतील. त्यात विविधतापण असावी आणि मी मग त्याप्रमाणे ५ कौशल्ये निश्चित केली.

१) पियानो वादन २) साबण निर्मिती

३) वारली चित्रकला ४) धनुर्विद्या

५) घड्याळ निर्मिती

सुरुवात अशी केली –

**१) पियानो वादन –**

पियानो वादन मी लॉकडाऊनमध्ये ३ महिने शिकलो होतो मात्र तेही अगदी जुजबीच मात्र आवश्यक तेवढं. मी ऑनलाईन शिकलो आता माझी शाळा अशा ग्रामीण व दुर्गम भागात आहे की जिथे २% पालक स्मार्ट फोन वापरतात आणि एक पियानो विकत घ्यायचा तर ५ ते १० हजार रु. लागतात. पण योगायोगाने मागील वर्षीच अतुल फौंडेशन गुजरात यांनी माझ्या इनोव्हेटिव्ह कामामुळे माझ्या शाळेला टॅबलेट दिले होते आणि आमचा तो मोठा प्रश्न इथे सुटला, मी पण टॅबलेट वरच पियानो शिकलो व विद्यार्थ्यांना पण टॅबलेटवरच शिकवण्याचं ठरवले. पण शाळा बंद असल्याने ऑनलाईन तर शिक्षण शक्यच नव्हते. आमच्या शाळेच्या परिस्थितीनुसार मग ब्लेंडेड पद्धत वापरायची ठरवली व दर २ दिवसांनी प्रत्येकाच्या घरी जाऊन मी त्यांना घरी टॅबलेट दिले व नियमित अभ्यासासोबत थोडसं पियानो नावाचं ॲप आहे त्यावर मुलांना एक ओळ वाजवा व तुम्ही सराव करा असे सांगितले. मला २ दिवसांनी वाजवून दाखवा असं सांगितलं. सुरुवातीला नक्कीच अडथळे येत गेले. मात्र २ आठवड्यानंतर मुले चांगला रिस्पॉन्स देऊ लागले. एप्रिल व मे २०२१ मध्ये शाळेच्या परिसरात कोविड रुग्ण वाढले व मी घरोघरी जाणे बंद झाले. पुन्हा शिकणं बंद.

मात्र मेच्या शेवटी परिस्थिती पूर्ववत झाली आणि जून महिन्यात सर्व पालकच मला शाळा सुरू करण्याबद्दल आग्रह करू लागले व आम्ही लेखी देतो असे म्हणून सर्वांनी लेखी दिले. १५ जूनपासून आमची ३ तासाची शाळा सुरू झाली व मग वरील सर्वच गोष्टी एका व्यवस्थितपणे सुरू झाल्या. आज इयत्ता २ री ते ४ थीची सर्व मुले चांगल्याप्रकारे छोटी छोटी गाणे, देशभक्ती गीते, प्रार्थना टॅबलेट वरील पियानोमध्ये वादन करतात. भविष्यात त्यांना जिथे कुठेही साधने उपलब्ध होतील, तिथेही प्रत्यक्ष वादन करून चांगले कलाकार होतील याची मला खात्री आहे. हे येथेच थांबले नाही तर ही फक्त सुरुवात आहे. यापुढे यात सातत्य ठेवणे हे आमच्यापुढे आव्हान असणार आहे. कारण मी ४ वर्गाला एकच शिक्षक, विविध प्रशासकीय कामे पण मी करत राहीन... आणि हो मी अद्याप शिकणे थांबवले नाही ... मी त्यातील नवीन नवीन शिकतोय कारण मला माझ्या विद्यार्थ्यांसाठी सातत्याने नवीन द्यायचं आहे.

**२) साबण निर्मिती –**

हे मी खास कारणाने शिकलो, जिथे माझी शाळा आहे तेथील ८०% पालक रंगकाम करण्यासाठी मुंबई, पुण्याला जातात मुले, वृद्ध आजी, आजोबापाशी राहतात. मी जवळपास ४ वर्षे झाली या शाळेत आहे. मुलांच्या स्वच्छतेबद्दल कितीतरी वेळा पालक भेटी घेऊनसुद्धा फरक पडत नव्हता आणि मग ठरवले की आपणच शाळेत साबण बनवायचे व ते घरी द्यायचे. लॉकडाऊनमध्ये हेही मी घरी बसून शिकलो. आवश्यक साहित्य ऑनलाईन मागवून घरी याचे प्रयोग करून पाहिले आणि मग त्यासाठी आवश्यक सर्व साहित्य विकत घेणे परवडणारे नव्हते. मग यातील काही गोष्टी आपण स्वत: उत्पादन करू शकतो हे माझ्या लक्षात आले व त्यातील प्रमुख घटक म्हणजे कोरफड. शाळेशेजारी एका घरी खूप कोरफड होती. ती लॉकडाऊनमध्ये आणून शाळेत लावली व ती चांगली आलीसुद्धा. आणि त्यासाठी लागणारे सोप बेस, मोल्ड हे ऑनलाईन मागवले व त्याच्या साह्याने प्रक्रिया सुरू केली. त्यासाठी मिक्सर लागतो, शाळेत वीज

लागते. मी शाळेशेजारील घरून स्वत:च्या पैशाने वीज विकत घेऊन वापरतोय आणि फ्रीजपण लागतोय. मग सुरुवातीला मी हे सर्व माझ्या घरून करून आणायचो. मात्र मुलांना सर्व प्रोसेस समजत नव्हती. मग शेजारील गुळीगकाका यांना विनंती करून त्यांचा मिक्सर शाळेत आणून मुलांना सर्व प्रोसेस प्रात्यक्षिक दाखवून ते २४ तास फ्रीजमध्ये ठेवण्यास सुद्धा पालकांची मदत सातत्याने घेतली. तयार साबणाचा शाळेत, जेवणापूर्वी, स्वच्छतागृह या ठिकाणी तर वापर होऊ लागला. सोबत प्रत्येक मुलाला २ आठवड्याला घरी १ साबण देण्यास सुरुवात केली व मुलांच्या स्वच्छता व आरोग्य याचा मोठा प्रश्न आज सुटला आहे. मात्र यासाठी आर्थिक पाठबळ लाभल्यास पूर्ण गावाला अल्प किमतीत साबण पुरवठा करण्याचा व त्यातून निधी उपलब्ध करण्याचा आमचा मानस असून फक्त वर्तमानच नव्हे तर मुलांनी भविष्यात साबण बनवण्याच्या व्यवसायात उतरून उद्योगपती व्हावे हासुद्धा हेतू, भविष्यकालीन धोरण आहे.

**३) वारली चित्रकला –**

माझ्या आयुष्यात मला कधीच शालेय जीवनात चित्रकला शिक्षक लाभले नाहीत. मला चित्र काढणाऱ्याबद्दल खूप कुतुहूल असायचं, कारण आपल्याला न येणाऱ्या गोष्टीबद्दल प्रत्येकाला कुतुहूल असतेच आणि मग ठरवले मी माझे विद्यार्थी तरी असे होऊ नयेत किंवा त्यांच्यावर ही वेळ येऊ नये. वारली चित्रकला खास करून मला विशेष भुरळ घालायची म्हणून मी त्याचे ऑनलाईन प्रशिक्षण घेतले. हे अगदी कमी खर्चात शाळेत राबवणे शक्य होणार होते. तरीसुद्धा 'निर्भीड फौंडेशन', म्हसवडचे डॉ. चेतन गलंडे सर आम्हाला दरवर्षी मुलांना चित्रकलेचा सेट देतात. त्याचा वापर आम्ही हे शिकण्यासाठी करू लागलो, मुले सहजतेने हे शिकू लागली. यातून आकार शिकायला मिळू लागले. अभ्यासाचा कंटाळा आला की मी हे घ्यायचो मग मुले ताजेतवाने पण व्हायचे. काही महिन्यात मुले कागदावर छान वारली चित्रे रेखाटू लागले आणि मी ठरवले की हेच काम आता शाळेच्या भिंतीवर करण्यासाठी हजारो रुपये जातात, मग पालकांना विनंती करून रंग आमचा व काम तुमचं असं म्हणून त्यांच्याकडून शाळेच्या सर्व खोल्या, संरक्षक भिंती रंगवून घेतल्या व त्या भिंतीवर आम्ही ब्रश व रंग हातात घेऊन धडपडू लागलो. आम्हाला लक्षात आले की कागदावर व भिंतीवर मोठा फरक आहे. मी सातत्याने या सर्व बाबींबद्दल नवीन नवीन माहिती घेऊन सहजता आणण्यासाठी प्रयत्न करत होतो. काही दिवसानंतर आम्हाला ते येऊ लागले व सुट्टीच्या दिवशी पण आमची शाळा वारली चित्रकलासाठी गजबजू लागली व काही दिवसात आमच्या शाळेचा कोपरा न् कोपरा वारलीमय झाला.

आम्ही इथेच थांबलो नाही तर मी गुगल इनोव्हेटर शिक्षक असल्याने मागील ५ वर्षापासून जगभरातील ४० देशासोबत आम्ही व्हर्च्युली जोडले गेले आहोत. मग नुसते परदेशी शाळांकडूनच आम्ही शिकतो असे नव्हे तर २२ देशांसोबत 'Culture Exchange Programme' या उपक्रमाअंतर्गत आम्ही तेथील शाळांना वारली चित्रकला व किल्ला निर्मिती प्रशिक्षण देऊन आपला संस्कृतीचा वसाही आम्ही जपत आहोत. भविष्यात माझ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या घरीच नव्हे तर त्याच्या कार्यालयात त्यांनी रेखाटलेले वारली पोर्ट्रेट मला पाहायचे आहेत व जगभरात वारली चित्रे एक्स्पोर्ट करताना मला माझ्या विद्यार्थ्यांना पाहायचे आहे.

**४) धनुर्विद्या –**

लॉकडाऊनमध्ये घरी असल्याने माझी मुलगी भक्ती मला विचारायची की, पापा तुम्ही माझ्या वयात कोणकोणते खेळ खेळायचात आणि यामध्ये मग धनुर्विद्याचा उल्लेख होताच. मला पण शिकवा असा तिचा सूर येऊ लागला व मग जसा मी लहानपणी लिंबाच्या झाडावर चढून त्यांची छोटी फांदी तोडायचो व त्याला दोरी बांधून धनुष्यबाण करायचो अगदी तसा माझ्या मुलीला मी बाण

तिच्यासमोर करून दाखवला. घरासमोरील मोकळ्या जागेत आम्ही दररोज सराव करायला लागलो. तर सहजपणे तिला तो चांगला येऊ लागला. सोबतच ऑलिम्पिक २०२० मध्ये आमच्या सातारा जिल्ह्यातील प्रवीण जाधव नावाचा अगदी सामान्य कुटुंबातील मुलगा धनुर्विद्यामध्ये जगभरात आपलं कौशल्य दाखवत होता. या प्रेरणेतून आपल्या शाळेत हे सहजपणे होऊ शकते याची मला कल्पना आली आणि शाळेभोवती असणाऱ्या लिंबाच्या झाडावर ४थी ची मुले भराभर चढून छोट्या फांद्या कढून आम्ही धनुष्यबाण बनवले. शाळेत टॅबलेट वर त्यांना कसा असतो बाण, कसा नेम धरतात, हे सर्व प्रक्रिया दाखवून शाळेचा संरक्षक भिंतीवर गोल करून १० फूट अंतरावरून आम्ही धनुर्विद्या शिकण्यास सुरुवात केली. सर्व पालक या बाबी पाहण्यास शाळेकडे येत व म्हणत की आमच्यावेळी नव्हती बा अशी शाळा. गुरुजीचं काहीतरी नवीनच असतं. बघा लिहिणं वाचणं विसरून जातील असेही काही आजीबाई म्हणायच्या. पण मी त्यांना सांगितले की तुम्ही विश्वास ठेवा असे काही व्हायचे नाही.

मुले प्राथमिक सर्व कौशल्य शिकली आहेत. आता आम्हाला आधुनिक साधनांची आवश्यकता आहे. मग त्यानंतर आम्ही स्पर्धेत सहभागी होण्याचा संकल्प केला आहे व भविष्यात ज्याच्याकडे याचं उत्तम कौशल्य आहे, त्याला जागतिक स्पर्धेत खेळताना मला पाहायचे आहे. यामुळे एकाग्रता वाढण्यास मला साह्य झाले.

**५) घड्याळ निर्मिती –**

नक्कीच घड्याळाचे दिवस कमी होताना दिसत असताना सुद्धा हे मुलांना का शिकवावे वाटले असेल? तर घड्याळ ही एक वैश्विक वस्तू आहे, तिचे स्वरूप बदलत जाईल, मात्र याची निर्मिती कशी होते याची वैयक्तिक मलाही उत्सुकता होतीच व आमच्या मुलांनाही. मग चीनमधल्या एका व्होकेशनल स्कूलमध्ये हा कोर्स सुरू असल्याची मला माहिती मिळाली. मात्र ते बाहेरील कोणाला प्रवेश देत नाहीत. मी वारंवार त्यांना माझे काम व माझा शिकण्याचा हेतू त्यांना कळवत राहिलो आणि त्यांनी काही मोजके व्हिडिओ पाठवण्याची तयारी दर्शवली. त्यातून मी काही पाहू शकलो आणि म्हसवडच्या घड्याळाच्या काझी यांचेसोबत बसून मी घड्याळ कसे असेम्बल होते हे प्रत्यक्ष पाहून शिकलो आणि त्याचे बनवण्याचे कीट मागवले. आर्थिक बाब सर्व स्वत:च्या खिशातूनच सुरू होती आणि त्याप्रमाणे शाळेत त्याचे डेमो दाखवू लागलो. अगदी बारकाव्याचे काम असल्याने मुलांना कठीण जाऊ लागले. मग यात्रेत मिळणाऱ्या घड्याळाचे सुट्टे पार्ट मागवून ते दाखवू लागलो. मग थोडे मुलांना समजू लागले, त्यापुढे जाऊन याही घड्याळाला मुले हळूहळू शिकत आहेत. लवकरच प्रत्येक मुलाला स्वत: बनवलेले घड्याळ त्यांच्या हातात असणार आहे व भविष्यात अशी प्रत्येक बाब तुम्ही स्वत: बनवू शकता हा विश्वास मला त्यांना द्यायचा आहे व एका जगप्रसिद्ध घड्याळाचा ब्रँड माझ्या विद्यार्थ्यांच्या नावे आपणास पाहावयास मिळेल अशी खात्री मला हळूहळू वाटू लागली आहे.

एकूणच शाळेचे दैनंदिन काम करत करत या बाबी करणे सहज तर नक्कीच नाही मात्र अशक्य पण नाही. त्यासाठी आर्थिक तरतूद ही मोठी समस्या सर्वांना भेडसावत असते. त्यावर सुद्धा प्रत्येकजण आपआपल्या परीने मार्ग काढू शकतात. सहकारी यांची साथ, प्रशासनाचे सहकार्य, शाबासकी अपेक्षित असते. याचं मूल्यमापन नसल्याने चुकत चुकत शिकत गेलो. माझ्या गरजेनुसार, आवडीनुसार मी यावर काम करतोय. प्रत्येक शिक्षकांनी असा वेगळा मार्ग शोधावा त्यासाठी मी शक्य त्यांना मदत करण्यास तयार आहे. शासनाकडून यात लक्ष घातल्यास अधिक सहजता व सुलभता येऊ शकेल. बस्स.. आपला विद्यार्थी हे डोळ्यासमोर ठेवल्यास काहीही अशक्य नाही .

**बालाजी बाबुराव जाधव, प्राथमिक शिक्षक**
जि.प.शाळा विजयनगर (पर्यंती)
ता. माण, जि. सातारा. ७५८८६११०१५

***


# अध्यापनातील सर्जनशीलता

**प्रास्ताविक –**

देशाच्या पुढच्या पिढीची बांधणी करण्यासाठी प्रत्येक देश आपली भौतिक साधन संपत्ती व मनुष्यबळ या दोहोंचीही व्यवस्थित गुंतवणूक करतो. त्यातही मनुष्यबळाचा विकास हा जास्त महत्त्वाचा आणि तो अर्थातच शिक्षण प्रक्रियेद्वारे होतो; कारण शिक्षण म्हणजे व्यक्तीविकासाचा दिशादर्शक दीप होय. (Education is great engine of Human development – नेल्सन मंडेला) म्हणनूच कोणत्याही राष्ट्राच्या शैक्षणिक व्यवस्थेची (मनुष्यबळ विकास विभागाची) त्या त्या राष्ट्रातील मनुष्यबळाचा शिक्षणाद्वारे विकास घडवणे ही जबाबदारी असते.

मनुष्यबळाचा विकास ह्यात 'शिक्षित समाज', 'सुजाण नागरिक' हे अभिप्रेत असतेच, पण 'सर्जनशील संशोधक, कलाकार, विचारवंतसुद्धा अभिप्रेत असतात. खरेतर प्रतिभासंपन्न असणं, सर्जनशील असणं ही काही फक्त साहित्यिक, कलाकार, संशोधक ह्यांचीच गरज नाहीतर प्रत्येकच क्षेत्रात (शेती, शिक्षण, व्यापार, व्यवस्थापन, उद्योग, राजकारण इ.) सर्जनशील व्यक्तींची गरज असते. कशा ओळखायच्या सर्जनशील व्यक्ती? (आकृती १ मध्ये सर्जनशील व्यक्तींची वैशिष्ट्ये दाखवली आहेत.) जेव्हा एखादी व्यक्ती तिचं काम मनापासून, व्यवस्थित, वेळेवर पूर्ण करते, तेव्हा त्या व्यक्तीत चिकाटी, प्रामाणिकपणा, जबाबदारीची जाणीव ही वैशिष्ट्ये विकसित झालेली असतात. पण जेव्हा एखादी व्यक्तीचे काम रूढपद्धतींपेक्षा वेगळी पद्धत वापरून करते, त्यात वेळ/श्रम/पैसे इ. साधनसंपत्तीचा कमी वापर करते, एखाद्या समस्येवर रूढमार्गाने उपाय दिसत नसताना मग त्या परिस्थितीत समाविष्ट असलेल्या विविध घटकांचा वेगवेगळ्या मार्गांनी विचार करते, पुनर्मांडणी करते, तेव्हा त्या व्यक्तीत सर्जनशीलता विकसित झालेली आहे असे म्हणता येते. पुढील पिढी अशाप्रकारे विकसित व्हावी हाच कोणत्याही शिक्षण व्यवस्थेचा उद्देश असतो.

केवळ बौद्धिक विकास हे शिक्षणाचे उद्दिष्ट नसून सर्जनशील विचारप्रक्रिया व प्रकटीकरण आवश्यक आहे. (The education must not aim at intellectual development but also at creative expressions- Raja Ramanna)


सर्जनशीलता
व्याख्या
सर्जनशील प्रक्रिया, परिपाक व सर्जनशील व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये
व्यक्ती वैयक्तिक पातळीवर व समूहातही सर्जनशील असतात.
सर्जनशील व्यक्ती खालीलपैकी एक किंवा अधिक प्रकारे विचार करतात.
बोलण्याद्वारे/ लिखाणाद्वारे/ चित्रे वा आकृत्यांद्वारे/ शारीरिक कृतींद्वारे
सर्जनशील कृतीचे परिणाम हे नेहमी मूळ व आद्य असतात.
संबोध/ उपपत्ती/ संबंध/ सामान्यीकरण/ रूपांतर/ परिणाम
खालील गोष्टींविषयी
घटना,व्यक्तीच्या अमूर्त संकल्पना व ऊर्जा
अधिकाधिक सर्जनशील होण्यासाठी
पूरक सामाजिक वातावरणनिर्मिती
विविध पद्धती व तंत्रे यांचा सर्जनशील विचारप्रक्रियेसाठी वापर
सर्जनशीलफल-निष्पत्तीसाठी प्रेरकांचा वापर
बुद्धिमंथन, वैशिष्ट्यांचे यादीकरण, भूमिकापालन, सर्जनशील समस्या उकलन व समाकरण
सर्जनशील प्रदानाचे मूल्यमापन
व्यक्ती काही प्रमाणात सर्जनशील असतात.
सर्व व्यक्तींकडे अधिकाधिक सर्जनशील बनण्याचे सामर्थ्य असते.
सर्व व्यक्तींच्या सर्जनशील प्रक्रियेत काही ना काही अडथळे असतातच.

**अध्ययन – अंतःस्थ संपत्तीचा शोध : डेलॉर कमिशनचा अहवाल**

देशाची गरजही फक्त सांगितलेले काम करत राहणाऱ्या व्यक्तींनी पूर्ण होत नाही तर नवीन कल्पना राबवणाऱ्या, नवनवीन आव्हाने स्वीकारून उभारणी केलेल्या उद्योगधंद्यांद्वारे, तसेच नवनवीन प्रयोग, नवीन संशोधने याद्वारे पूर्ण होते. हे करण्यासाठी– अध्ययन–अंतःस्थ संपत्तीचा शोध घेण्यासाठी डेलॉर कमिशनचा अहवाल पूरक ठरतो.

(१९९६ साली संयुक्त राष्ट्रसंघाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक परिषदेने एकविसाव्या शतकातील भविष्यकालीन शैक्षणिक अपेक्षा व्यक्त करणारा एक अहवाल डेलॉर यांनी सादर केला होता.) त्यांनी २१ व्या शतकातील शिक्षणाचे चार स्तंभ मांडले आहेत. ते असे –

**१. ज्ञानासाठी शिक्षण** (learning to know) :

युनेस्कोने असे मंजूर केले आहे की मानवाचे अस्तित्व, उद्दिष्टे व कार्यासाठी 'शिक्षण' आहे. हा स्तंभ शिक्षकांकडून अशी अपेक्षा करत आहे की त्यांनी विद्यार्थ्यांना विषय माहीत करून घेणे व त्या संबंधीच्या आकलनात वाढ करणे यासाठी प्रवृत्त करावे. तसेच विद्यार्थ्यांनी सतत शिकत राहणे व शोध घेत राहणे या वृत्तीला चालना व प्रोत्साहन देत राहावे. विद्यार्थ्यांना तार्किक/चिकित्सक पातळीवर सुसंगत विचार करण्याची सवय लावावी. विद्यार्थ्यांना वैज्ञानिक साधने व पद्धतींची माहिती असावी व आवश्यकतेनुसार त्यांचा योग्य तो वापर करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण व्हायला हवी.

**२. कृतीद्वारे शिक्षण** (learning to do) :

(कृतीद्वारे अध्ययन–कृती व कौशल्ये यांचा विकास) : जॉन ड्यूई यांच्या कृतीद्वारे शिक्षण या मांडणीशी हे सुसंगत आहे. यात प्रत्यक्ष अनभुवांतून शिक्षण यावर भर दिला जातो. शिक्षक प्रायोगिक पद्धती, स्वत: कृती करणे या पद्धतीने अध्यापन करण्याला अधिक प्राधान्य देतात, यामुळे कोणत्याही परिस्थितीत विशिष्ट घटक, त्यातील संबंध, गरजा ओळखून योग्य ती कृती करून विद्यार्थ्याला परिस्थितीला व्यवस्थित तोंड देण्यास प्रवृत्त केले जाते.

**३. अस्तित्वासाठी शिक्षण** (learning to be):

बोधात्मक, भावात्मक व क्रियात्मक या तीनही पातळ्यांवर विकास–(जाणीव व आकलन क्षमता यात वाढ)– या स्तंभांतर्गत शिक्षकांकडून असे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांच्या शरीर व मन यांचा विकास, बुद्धिमत्ता, कला व सौंदर्यविषयक जाणीवा, वैयक्तिक जबाबदाऱ्या यांचे भान व आध्यात्मिक मूल्ये या पातळीवर विकासाला चालना मिळावी. कल्पनाशक्तीची वैशिष्ट्ये आणि सर्जनशीलतेच्या विकासालाही खतपाणी घातले जावे.

**४. सामाजिकीकरणासाठी शिक्षण** (learning to live together):

वेगाने बदलणाऱ्या जगात फक्त स्वतःसाठी विचार करणे पुरेसे नसते. त्यापेक्षा विविध कृती, त्यांचे समाजावर होणारे परिणाम या शक्यतांचा विचार करायला प्रवृत्त करायला हवे.

आजची आपली शिक्षणव्यवस्था ही उद्दिष्टे पूर्ण करत आहे? अर्थातच नाही. कारण आपली शिक्षणव्यवस्था डाव्या मेंदूच्या विकासावर अधिक भर देते आहे. उजव्या मेंदूच्या विकासावर फारसे लक्ष नसते. (श्री. विजय गोविन्दराजन – भारतीय शिक्षणव्यवस्थेवर भाष्य करताना)

खालील तक्त्यात डाव्या आणि उजव्या मेंदूची कार्ये दिली आहेत.

**तक्ता १ : मेंदूच्या अर्धगोलांची कार्ये**

| डावा मेंदू | उजवा मेंदू |
|---|---|
| तर्कसंगत विचार प्रक्रिया | उद्वाही/उद्गामी विचार प्रक्रिया |
| शाब्दिक सूचनांना प्रतिसाद | दिग्दर्शित सूचनांना प्रतिसाद |
| परिस्थितीतील सर्व घटकांचा क्रमाने विचार करून समस्या उकलन | परिस्थितीतील विविध घटकांची संरचना, मांडणीचा नमुना विचारात घेऊन अंत:प्रेरणेने समस्या उकलन |
| भिन्नता/वेगळेपणा असणाऱ्या बाबींकडे लक्ष | साम्य असलेल्या बाबींकडे लक्ष |
| विचारप्रक्रिया नियोजित व रचनात्मक | विचारप्रक्रिया उत्स्फूर्त व लवचिक |
| पूर्वी संकलित केलेल्या आणि व्यवस्थित मांडणी करून ठेवलेल्या माहितीस प्राधान्य | आभासी/अनिश्चित माहितीस प्राधान्य |
| बोलणे व लिहिणे ह्यावर अधिक भर | रेखाटने, वस्तू हाताळणे ह्यावर अधिक भर |
| निर्णय घेणे व मत व्यक्त करणे ह्याबाबत श्रेणीबद्ध अधिकार पदांनुसार प्राधान्य | काम करणाऱ्या सर्वांना निर्णय घेण्याचा/ मत व्यक्त करण्याचा अधिकार |
| भावनांवर नियंत्रण | भावना मोकळेपणाने व्यक्त |

मेंदूच्या अर्धगोलांच्या कार्यावरून एक गोष्ट निश्चित होते की भावी पिढी सर्जनशील निर्माण करायची, घडवायची तर उजव्या मेंदूला चालना मिळेल असे अध्ययन अनुभव मुलांना लहान वयापासूनच मिळायला हवेत. त्यासाठी अध्यापनाचे/मूल्यमापनाचे रूढमार्ग सोडून नवीन मार्गांचा स्वीकार शिक्षकांनी करायला हवा- शिक्षकांनी सर्जनशील बनायला हवे.

हा विचार प्रत्यक्षात आणायचा असेल तर शिक्षण-प्रशिक्षण संस्थांची गरज आहे. कारण प्रशिक्षित शिक्षकच विद्यार्थ्यांना योग्य दिशा देतात. सर्व शिक्षण-प्रशिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थी शिक्षक-शिक्षिकांची व्यावसायिक तयारी करून घेतली जाते. तिथेच भावी सर्जनशील शिक्षक घडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनी जेव्हा शिक्षक होण्यासाठी अशा संस्थांमध्ये येतात, तेव्हा त्यांच्या कुठल्या वैशिष्ट्यांचा विकास झालेला असतो?/नसतो? ह्याचाही प्रथम विचार व्हायला हवा.

**भारतातील शिक्षक-प्रशिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थी शिक्षक-शिक्षिकांची सद्यस्थिती :**

१. बहुसंख्याक विद्यार्थी -विद्यार्थिनींना पाठ्यपुस्तकातील आशयाचा विविध मार्गांनी विचार करून अर्थ लावायला जमत नाही .

२. विविध मार्गांनी पाठ्यांशाचा सारांश व्यक्त करायला अवघड जाते.

३. एखाद्या घटनेच्या परिणामांचा विचार/दृश्यीकरण करणे कठीण जाते.

४. दिलेल्या नोंदींचे विविध निकषांनुसार वर्गीकरण करणे कष्टप्रद होते.

५. वर्तमानसंदर्भात आलेल्या अनभुवांचा अर्थ लावण्यासाठी पर्यायी उत्तराची जोडणी करणे सहज शक्य होत नाही.

६. रोजच्या जीवनात घडणाऱ्या घटनांचा

अध्यापनाच्या आशयाशी संबंध जोडणे अवघड वाटते.

७. कोणताही एखादा प्रयोग यशस्वी झाला नाही तर त्या मागील कारणांचा अंदाज व्यक्त करता येत नाही.

ह्या अशा विद्यार्थ्यांमधून भावी सर्जनशील शिक्षक घडवायचे असतील तर सर्जनशील शिक्षक कसा असेल हे आधी ठरवावे लागेल. हे पुढील क्रियात्मक व्याख्येवरून स्पष्ट होईल.

**अध्यापनातील सर्जनशीलता– क्रियात्मक व्याख्या**

शिक्षकाकडे अध्यापनातील सर्जनशीलता आहे असे तेव्हाच म्हणता येते जेव्हा तो – मनाचा खुलेपणा, समस्येबद्दलची संवेदनशीलता, कल्पना/विचार यातील वैपुल्य, लवचिकता आणि मौलिकता (नवनिर्मिती क्षमता) तसेच स्पष्टीकरण क्षमता, पुनर्मांडणी क्षमता आणि हिकमत/चातुर्य या क्षमतांचा अध्ययन प्रक्रियेचा सुलभक म्हणून काम करताना योग्य/उचित वापर करतो/करते

वरती उल्लेख केलेल्या क्रियात्मक व्याख्येतील अध्यापनातील सर्जनशीलतेतील विविध घटकांचा अन्वयार्थ पुढीलप्रमाणे –

**१. वैपुल्य (**Fluency**)– विविध कल्पना, प्रतिसाद, प्रश्न, शाब्दिक/अशाब्दिक सूचना –**

हे सर्व मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्याची क्षमता असते. विचार व कल्पना यांचा ओघवता प्रवाह असतो. अभ्यास/समस्या विषयाशी सबंधित आशय/कल्पना/प्रतिक्रिया यांची मोठी संख्या असे सर्व त्या व्यक्तीकडे असते.

**२. लवचिकता** (Flexibility)– विविध समस्या, त्यामागील कारणे व त्यासाठीचे उपाय सुचवण्याची व स्पष्ट करण्याची तसेच या सदंर्भात विविध कल्पनांना जन्म देण्याची क्षमता असणे. यात विविध निकषांनुसार विविध प्रतिक्रियांची मोठी संख्या असते. जे जुने आहे, ते तसेच वापरणे व स्थिर ठेवणे या विविध निकषांनुसार त्यात बदल करण्यासाठी विचारांची लवचिकता ठेवणे व कल्पना व्यक्त करण्याचे स्वातंत्र्यही अभिप्रेत आहे.

**३. नवनिर्मिती क्षमता/मौलिकता** (Originality)– असामान्य कल्पना व्यक्त करणे, कृती करण्याचे विविध नवनवीन मार्ग सुचणे, वैविध्यपूर्ण प्रश्न पडणे, कोणतीही कृती नेहमीपेक्षा भिन्न व वेगळ्याप्रकारे करण्याची क्षमता असणे.

४. **स्पष्टीकरण** (Elaboration)–आपल्या विषयातील एखादी मूळ संकल्पना तसेच एखादी वस्तू/घटना आणि आकृती/ नकाशा/प्रतिकृती यांच्याशी संबंधित अधिक तपशील पुरवणे व कल्पनांच्या प्रकटीकरणाचे परिणाम तपासणे.

५. **प्रश्नांची संवेदनशीलता** (Sensitivity to the problem)– पाठ्यविषयाशी संबंधित मुद्द्यांच्या मांडणीकडे बारकाईने लक्ष दिलेले असते. त्यातील फरक, साम्य, विरोधाभास, कमतरता, सूक्ष्म विसंगती हे सर्व माहीत करून घेतले जाते. समस्येतील विविध घटकांमधील परस्पर संबंध प्रस्थापित करणे, जर प्रश्न तसाच राहिला तर त्या प्रश्नाच्या उत्तराचे भविष्यातील परिणाम कोणते होतील याचा विचार करणे.

६. **पुनर्मांडणी** (Redefinition)– जेव्हा परिचित वस्तू/व्यक्तीचा अपरिचित कामासाठी वापर करण्याची वेळ येते, तेव्हा परिचित व्यक्ती, प्रसंग, घटना यांच्याशी संबंधित बाबींचा अर्थ लावण्याची जुनी /प्रचलित विचारपद्धती कटाक्षाने टाळणे व त्यात सहभागी असलेल्या घटकांचा भिन्न परंतु योग्य दिशेने प्रयत्न करण्याची क्षमता असते. यात नेहमीच्या प्रस्थापित बाबींपेक्षा फार वेगळेपणा असतो. तसेच चिन्हे/आकृत्या /आलेख या स्वरूपात मांडणीवर भर असतो.


७. **मनाचा खुलेपणा** (Openness)– कोणताही पूर्वग्रह न ठेवता नवनवीन कल्पना, विचार, मते स्वीकारण्याची तयारी असणे. विविध क्षेत्रे, अभ्यास विषय यात रूची असणे, सर्वांच्या भावनांना किंमत देणारा अशी वृत्ती असते. व्यक्तीच्या सर्व प्रकारच्या

भावनांना किंमत दिली जाते. स्वीकारलेल्या मूल्यांचेही पुनर्परीक्षण करण्याची संधी असते.

८. **हिकमत/चातुर्य** –(Resourcefulness)– स्पष्ट तसेच वैशिष्ट्यपूर्ण धोरण/ उपाय वापरून विविध प्रश्नांवर भिन्न, अपारंपरिक) व नवीन मार्गाने उपाय वापरून मात करण्याची क्षमता असते.

खालील आकृतीत ह्या घटकांचा परस्पर–संबंध स्पष्ट केला आहे.

**अध्यापनातील सर्जनशीलतेच्या घटकांचा परस्पर सहसंबंध**




वरील वैशिष्ट्यांपैकी किमान काही वैशिष्ट्ये तरी प्रशिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थी शिक्षक–शिक्षिकेकडे असायला हवीत. तरच प्रशिक्षण झाल्यानंतर या वैशिष्ट्यांमध्ये गुणात्मक बदल दिसून येईल आणि राष्ट्रीय शैक्षणिक प्रशिक्षण व अनुसंधान समितीची पुढील वैशिष्ट्यपूर्ण होतील.

(संदर्भ: राष्ट्रीय शैक्षणिक प्रशिक्षण व अनुसंधान विषयक समितीने शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकरिता तयार केलेल्या हस्तपुस्तिकेतील चांगल्या शिक्षकांची वैशिष्ट्ये)

१. परिस्थितीतील सर्व घटकांचा योग्य विचार करून समस्येच्या उत्तरासाठी नवीन पद्धत तयार करते/ करतो.

२. शिक्षक वैयक्तिक पातळीवर मूलगामी विचार करून आणि प्रसंगाला अनुसरून बदल करूनही समस्या उकलनासाठी जी पद्धत वापरतो ती सर्जनशील असते.

३. स्वत:च्या कल्पना व्यवस्थितपणे व्यक्त/ स्पष्ट करते/करतो.

४. शिक्षकाकडे विविध समस्यांवर तोंड देण्यासाठी विविध नवीन मार्ग हाताळण्याची क्षमता असते.

५. असा सर्जनशील शिक्षक प्रसंगनिष्ठ/ व्यक्तिनिष्ठ प्रतिक्रिया सहसा देत नाही.

असा शिक्षक हा सर्जनशील शिक्षक असेल. अशा शिक्षकांकडून भावी पिढी जेव्हा सर्जनशील घडेल, तेव्हा शिक्षणप्रणालीचे उद्दिष्ट साध्य होईल. सर्जनशील विचारप्रक्रिया जेव्हा देशाचे नागरिक सहजतेने वापरू लागतील, तेव्हा देशाच्या

विकासाला उचित चालना मिळेल हे मा. डॉ. कलाम यांच्या खालील काव्यपंक्तीतून स्पष्ट होते आहे.

‘जेव्हा अध्ययन सहेतूक घडते, तेव्हा सर्जनशीलतेला धुमारे फुटतात.
जेव्हा सर्जनशीलतेला धुमारे फुटतात, तेव्हा विचार प्रक्रियेला चालना मिळते.
जेव्हा विचारप्रक्रिया जागरूक होते, तेव्हा ज्ञान झळाळते.
जेव्हा ज्ञान झळाळते, तेव्हा अर्थव्यवस्थेची भरभराट होते.

– माजी राष्ट्रपती भारतरत्न
डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम.

**संदर्भ–**

1) Bam R. Y. (2006). n Experimental Study of Student Teachers from University of Pune for Improving their Creativity in Teaching. thesis submitted to University of Pune for the degree of Doctor of Philosophy in Education under guidance of Dr. Suman P. Karandikar. Department of Education Extension, University of Pune.


2) Delors, J., Unesco. (1996). International Commission on Education for the Twenty-first Century, Learning, the treasure within: Report to UNESCO of the International Commission on Education for the Twenty-first Century. Paris: UNESCO Pub.

3) Govindrajan, V. (Jan.15, 2006). What will it take to become a nation of innovators? BusinessToday: 14th nniversary issue, 160-164.

4) NCERT (2004).Curriculum framework for Teacher Education. New Delhi

**– प्रा.डॉ. राजश्री बाम**
निवृत्त अधिव्याख्याता,
शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
गोखले एज्युकेशन सोसायटी

***



# 'अवगुण सोडिता जाती। उत्तम गुण अभ्यासिता येती।'

**चौपदी**

कोमळ वाचा दे रे राम। विमळ करणी दे रे राम।।
प्रसंग ओळखी दे रे राम। धूर्तकळा मज दे रे राम।।
हीतकारक दे रे राम।
जनसुखकारक मज दे रे राम।।
अंतरपारखी दे रे राम। बहुजनमैत्री दे रे राम।।
विद्यावैभव दे रे राम। उदासिनता दे रे राम ।।
मार्गों नेणें दे रे राम। मज न कळे तें दे रे राम।।
तुझी आवडी दे रे राम। दास म्हणे मज दे रे राम।।
संगीत गायन दे रे राम। आलाप गोडी दे रे राम।।
धातमाता दे रे राम। अनेक धाटी दे रे राम ।।
रसाळ मुद्रा देरे राम । जाड कथा मज दे रे राम।।
दस्तक टाळी दे रे राम। नृत्यकळा मज दे रे राम।।
प्रबंध सरळी दे रे राम। शब्द मनोहर दे रे राम।।
सावधपण मज दे रे राम। बहुत पाठांतर दे रे राम।।
दास म्हणे रे सद्गुणधाम।
उत्तम गुण मज दे रे राम।।
पावन भिक्षा दे रे राम। दीनदयाळा दे रे राम ।।
अभेद भक्ती दे रे राम। आत्मनिवेदन दे रे राम ।।
तद्रुपता मज दे रे राम। अर्थारोहण दे रे राम ।।
सज्जन संगती दे रे राम। अलिप्तपण मज दे रे राम।।
ब्रह्म अनुभव दे रे राम। अनन्य सेवा दे रे राम ।।
मजविण तूं मज दे रे राम।
दास म्हणे मज दे रे राम।।
श्रीराम जयराम जयजयराम।
श्रीराम जयराम जयजयराम।

शाळा, कारखाने, विविध संस्था यामध्ये तसेच कलाक्षेत्रे, उद्योग, व्यवसाय इथे परवलीचा शब्द कोणता आहे? 'यश मिळविणे' – मग यशासाठी काय हवे? व्यक्तिमत्त्वाचा विकास. व्यक्तिमत्त्व म्हणजे काय? कशातून व्यक्तिमत्त्व दिसते? 'व्यक्ती तितक्या प्रकृती' असे आपण म्हणतो. प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व वेगळे, ते व्यक्तीच्या कृती, भावना, देहबोली, कर्तृत्व यातून प्रगट होते. वातावरण, कुटुंब, परिस्थिती, समाज यांचा परिणाम व्यक्तिवर होतो. व्यक्ती घडते-बिघडते.

व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास कसा व्हावा, कोणत्या दिशेने व्हावा, याबद्दल प्रत्येक क्षेत्रातील तज्ज्ञांची मते, विचार वाचनात येत असतात. शालेय जीवनात, जाणीवपूर्वक, व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे मिळत गेले तर व्यक्तिघडण चांगल्या प्रकारे होऊ शकते. जगण्याची कला समजत जाते. त्यासाठी प्रत्येकाचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आत्मिक विकास व्हायला हवा. 'कोमळ वाचा दे रे राम' या प्रार्थनेत समर्थ रामदासांनी केलेली 'सद्गुणांची मागणी' व्यक्तिमत्त्व विकास करण्याचा सर्वोत्तम पाठ आहे.

**१. कोमळ वाचा दे रे राम – संभाषण कौशल्य**

माणसाचे बोलणे कसे असावे? वाणीत बोलण्यात गोडवा हवा. ज्याची वाणी चांगली, त्याची सर्वांशी मैत्री. समाजात वावरताना अनेकांशी आपण बोलत असतो. इतरांशी संवाद साधावा लागतो. वादाचा प्रसंग आला तरी आपले म्हणणे इतरांना पटवून देणे हे कौशल्यच आहे. सूचक, सविस्तर, विनोदी, इतरांना समजेल असे अनेक प्रकारचे आवश्यक व योग्य बोलणे गरजेचे असते. बोलण्यातून व्यक्ती समजते. वाणी कोमल नसेल तर बोलणेच खुंटते. 'उत्तम बोलणे' – यातून स्वतःला व्यक्त करणे हा व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा पैलू समर्थांनी सांगितला आहे.

**२. विमल करणी दे रे राम। – निर्मळ कर्तृत्व**

निस्पृह, निरपेक्ष वृत्तीने कार्य करण्याची क्षमता असणे.

''जोडोनिया धन उत्तम वेव्हारे । उदास विचारे वेच करी ।।'' ही वृत्ती कृतीमध्ये असावी. असे संत तुकारामांनी सांगितलेच आहे. म्हणजेच 'विमल करणी' जी कृती, जो व्यवहार करायचा तो स्वच्छ, पारदर्शी हवा. इन्फोसिसचे नारायण मूर्ती, बाबा आमटे, डॉ. अभय बंग ही व्यक्तिमत्त्वे 'विमल करणी'ची उदाहरणे आहेत. निर्मळ कर्तृत्वासाठी समर्थ सांगतात, 'कारबार करिता उमजते । सकळ काही ।।'

**३. प्रसंग ओळखी दे रे राम। धूर्तकळा मज दे रे राम ।। – प्रसंगावधान व चातुर्य**

आजूबाजूचे भान असणे – हा व्यक्तिमत्त्वाचा गुण आहे. भोवतीच्या घडामोडींबद्दल सजगता असणे गरजेचे. येणाऱ्या प्रसंगाची पाऊले ओळखात यायला हवीत. आधुनिक जगात, वेगाने बदलणारी स्थिती समजून घेणे व त्यानुसार पुढे जाणे ही व्यक्तीची गरज झाली आहे. ''थांबला तो संपला''. कृतीशील राहण्यासाठी, परिस्थितीबद्दल जागरुकतेने व चातुर्याने वाटचाल करता येणे हा व्यक्तिमत्त्व विकासाचा एक टप्पा आहे. ज्याला प्रगती करायची आहे त्याला हुषारीने वागायला हवे.

समर्थ म्हणतात, ''चातुर्ये बहुतांसी रक्षिले नाना प्रकारे।''

**४. हितकारक, जनसुखकारक दे रे राम। – मदत व सेवा**

स्वहित जपताना, इतरांचा विचार करता येणे – ही व्यक्तिमत्त्वाची जमेची बाजू. वैद्यकीय व्यवसाय करणारे स्वार्थ व जनसेवा दोन्ही साधू शकतात. स्वयंशिस्त पाळणे हितकारक आहेच; पण त्याचा प्रभाव इतरांवर सुद्धा पडतो. 'माझे पण माझे, अन् तुझ्या वाट्याचे पण माझेच'–अशा स्वार्थी वृत्तीने व्यक्तिविकास होत नाही. प्रसंगावधान व चातुर्य. जनसुखकारक तर नाहीच.

**५. अंतरपारखी मज दे रे राम । –स्वतःचा शोध**

स्वतःला बघायचे. स्वतःच्या मर्यादा व बलस्थाने ओळखता येण्यासाठी मनन, चिंतन व आत्मपरीक्षण हवे असे समर्थ सुचवितात. स्वतःच्या सुख–दुखाःचा शोध लागला की, इतरांकडे डोळसपणे बघता येते. अंतरंगाची पारख असलेल्या ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ इ. संतांची व्यक्तिमत्त्वे आदर्श वाटतात, कारण स्वतःचा थांग लावणे ही महाकठीण गोष्ट त्यांना साधली. समर्थांचा भर अंतरंगातील सुधारणा करण्यावर आहे.

**६. बहुजन मैत्री दे रे राम। – सौहार्द**

परस्पर स्नेह असण्यामुळे दैनंदिन जगणे सोपे होते. मैत्रीमुळे इतरांचा सहानुभूतीने विचार करण्यास व्यक्ती शिकते. 'एकमेका साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ'... ही गोष्ट मैत्रीतून साध्य होते. मैत्रीतून माणसे समजतात. स्वतःमध्ये बदल घडविण्यास मैत्री उपयुक्त आहे. मित्राकडून मार्गदर्शन, योग्य सल्ला मिळतो. अडचणींचे निवारण होते. प्रगतीच्या वाटा मैत्रीतून सापडतात. लोकसंग्रह हा उत्तम गुण आहे. मित्रत्व कधी मिळेल? नाना उत्तम गुण सत्पात्र। तोचि मनुष्य जगन्मित्र ।।'

**७. विद्यावैभव दे रे राम। –ज्ञान**

ज्ञानाचे असंख्य दरवाजे खुले असतात. अर्थपूर्ण जगण्यासाठी शिक्षण हवे. शिक्षण – ज्ञान विज्ञानाचे – महत्त्व पटणारी माणसे समाजाला उन्नतीकडे नेतात. महर्षी कर्वे, सावित्रीबाई फुले, भाऊराव पाटील यांचे कार्य शिक्षणातून समाजाला पुढे नेणारे होते. जाणत्यास कळे वर्म नेणत्याचे खोटे कर्म ।।'

८. व्यक्तिमत्त्व विकासात संगीत, नृत्य, साहित्य, काव्य, कथा आलाप, अभिनय, रसाळ मुद्रा, मनोहर शब्द, पाठांतर, सावधपण या पैलूंचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. समर्थांनी या गुणांची मागणी त्यांच्या प्रार्थनेत केली आहे.

**९. अभेद्य भक्ती दे रे राम । आत्मनिवेदन दे रे राम। – निष्ठा**

सर्वशक्तिमान् निसर्ग, परमेश्वर यांच्यावरील श्रद्धा हे स्वतःला विनम्र करण्याचे चिन्ह आहे. आई-वडील, गुरूजन यांच्याबद्दल आदर असणे हे कृतज्ञतेचे दृश्य रूप आहे. भक्ती हवी. स्वतःला व्यक्त करता येणे, विचार, मते, भावना सांगता येणे हा व्यक्तिमत्त्वाचा एक पैलू आहे. त्यासाठी आत्मविश्वास वाढीस लावायला हवा.

**१०. तद्रुपता मज दे रे राम। अर्थारोहण मज देरे राम ।– एकरूपता**

कोणतीही कृती एकरूपतेने करण्याची व आकलन क्षमता समर्थ मागतात. अध्ययन करताना, असंख्य गोष्टीत मन धावू लागले तर काहीच नीट होणार नाही. संशोधन, खेळ, कला, दैनंदिन कामे लक्षपूर्वक करण्याने फायदा होतो. अर्थारोहण म्हणजे अर्थ समजण्याची पात्रता. शब्द ते कृती याचे आकलन जेवढे लवकर होते, तेवढा प्रगतीचा टप्पा जवळचा. लहानपणीच मुलांना संधी, व विविध माध्यमे उपलब्ध झाल्याने कितीतरी माहिती त्यांना अवगत होते. त्यामुळे भराभर समजून घेण्याची क्षमता वाढीस लागते. अर्थारोहणाने कार्यकारणभाव समजतो. तद्रुपतेतून आकलन वाढते.

**११. सज्जनसंगती दे रे राम। अलिप्तपण मज दे रे राम।।**

सुष्ट-दुष्ट, चांगले-वाईट या प्रवृत्ती समाजात असतात. सज्जनांचे सान्निध्य मनुष्य घडणीला पोषक ठरते. निरपेक्ष वृत्तीने काम करणाऱ्यांचा सहवास लाभल्यामुळे सामान्य माणसात बदल होतो. प्रेरणा मिळते. उत्साह वाढतो. स्वतःच्या मर्यादा समजूनही चांगले काही करण्याची क्षमता निर्माण होते. सगळ्यांसाठी खूप काही करून बाजूला होणे हा विशेष पैलू.

स्वत:मध्ये बदल घडवून आणण्यासाठी आत्मपरीक्षण करायला हवे. मन व बुद्धी यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करावा लागतो. ब्रह्म अनुभव, अनन्यसेवा, सद्गुण धाम यांची मागणी समर्थ करतात. त्यांच्या ग्रंथात उत्तम गुणांचे महत्त्व सांगितले आहे. प्रयत्नाने दोष कमी करता येतात. चांगले गुण संपादन करता येतात. त्यातून व्यावहारिक व आध्यात्मिक यश मिळविता येते. 'कोमलवाचा दे रे राम' – ही प्रार्थना स्वत:चा शोध घ्यायला लावणारी आहे. यातील प्रत्येक ओळ वाचून, माझ्यात कोणते गुण-अवगुण आहेत? दोष नाहीसे होण्यासाठी मी काय करू शकतो? का व कसे करायचे? असा विचार व प्रश्न मनात निर्माण झाल्यामुळे व्यक्तिचा विकास होईल. आज व्यक्तिमत्त्व विकास व व्यवस्थापन तंत्र ह्याना जे महत्त्व प्राप्त झाले आहे, त्याचे तंत्र व मंत्र समर्थ रामदासांनी सांगून ठेवले आहे. त्यांच्या अनेक प्रार्थना व ग्रंथांमध्ये ते आता आचरणात आणायला हवे. समर्थांच्या समग्र जीवन चरित्रातून व ग्रंथातून हा बोध मिळतो.

**– चारुता पुराणिक**
ज्ञान प्रबोधिनी, पुणे
प्रशिक्षक वर्ष ८ अंक १

**शैक्षणिक उपक्रम संशोधिका,**
**ज्ञान प्रबोधिनी**

**पत्ता : ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.**
**दूरभाष : ०२०-२४२०७२०९ / २४२०७१२७**
**prashikshak@jnanaprabodhini.org**